नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत.
(हातकणंगले नगरपंचायत जि.कोल्हापूर)

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक-संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२८(७)/का-१४११,**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २० मे, २०२६.

वाचा :-

१. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३३/का.१४११, दि.२८.०३.२०२२.
२. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.६८(२७)/का.१४११, दि.२०.१०.२०२५.

प्रस्तावना:-

विषयांकित योजनेच्या वाचा येथील शासन निर्णयान्वये हातकणंगले नगरपंचायत, हुपरी नगरपरिषद व वडगाव नगरपरिषद जि.कोल्हापूर येथील विकासकामांसाठी एकूण रु.०५.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. आता वाचा येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मधील अ.क्र.१ येथे नमूद विकासकामांची मान्यता रद्द करुन, त्याऐवजी सुधारित विकासकामांस मान्यता देण्याची व कार्यान्वयीन यंत्रणेमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुध्दीपत्रक:-**

उपरोक्त वाचा येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मधील अ.क्र.१ येथे नमूद **हातकणंगले नगरपंचायत हद्दीतील रामलींग फाटा इंगवले प्लॉट ते लक्ष्मी मंदिर रस्ता डांबरीकरण करणे** (रु.५०.०० लक्ष) या विकासकामाची मान्यता कार्यारंभ आदेश दिला नसल्याच्या अधिन राहून रद्द करण्यात येत असून, त्याऐवजी हातकणंगले नगरपंचायत अंतर्गत खालीलप्रमाणे सुधारित विकास कामास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नवीन मंजूर करावयाचे काम | रक्कम (रु.लक्ष) |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.८ मध्ये कॉंक्रीट रस्ते व गटर करणे.<br>१) वठारे घर ते सोनाली पब्लिक स्कुलपर्यंत गटर करणे.<br>२) मिलिंद पोतदार घर ते बाळुमामा मंदिरापर्यंत गटर करणे.<br>३) तांदळे घर ते गायकवाड घरापर्यंत गटर करणे.<br>४) मुख्य रस्ता ते सोनाली पब्लिक स्कुल पर्यंत गटर करणे.<br>५) अभिजित कुलकर्णी घर ते कोळी घरापर्यंत गटर करणे.<br>६) सचिन लाडे घर ते कुमार चव्हाण घरापर्यंत गटर करणे.<br>७) डांगे कॉलेज ते हेमंत महाडीक घरापर्यंत गटर करणे.<br>८) हेमा जाधव घर ते कांबळे घरापर्यंत गटर करणे.<br>९) हेमा जाधव घर ते कांबळे घरापर्यंत कॉंक्रीट रोड करणे. | ५०.०० |
| | **एकूण** | **५०.००** |

२. वरील प्रमाणे सुधारित विकासकामांची व वाचा क्र.२ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ आणि परिषिष्ट-ब येथे नमूद विकासकामांची कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर राहील. सुधारित कार्यान्वयीन यंत्रणेने वाचा क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली विकासकामे गुणवत्तेनुसार होत आहेत याची खातरजमा करावी. तसेच वाचा क्र.१ मधील सर्व तरतूदींचे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

३. या संदर्भातील इतर अटी व शर्ती वाचा क्र.२ येथील शासन निर्णयाप्रमाणे लागू राहतील.

४. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून, त्याचा संकेतांक २०२६०५२०१४५८००७११६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHUSHAN BABANRAO GAIKWAD

Digitally signed by BHUSHAN BABANRAO GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Planning Department, 2.5.4.20=F641CD815EF3AAFB3FEFD709BEE4854EBA8DA339A6D50103BED2978DEB210779, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=326135C8D6C60D6D3E74E7A24D83F161A690C74E68B017AB7C4793CD6BD8F98A, cn=BHUSHAN BABANRAO GAIKWAD
Date: 2026.05.20 14:59:10 +05'30'

**(भूषण गायकवाड)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. विभागीय आयुक्त, पुणे विभाग.
२. जिल्हाधिकारी, कोल्हापूर.
३. मुख्याधिकारी, हातकणंगले नगरपंचायत, जि.कोल्हापूर.
४. मुख्याधिकारी, हुपरी नगरपरिषद, जि.कोल्हापूर.
५. जिल्हा नियोजन अधिकारी, कोल्हापूर.
६. मा.मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
८. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर.
१०. वित्त विभाग, व्यय-८/कोषा प्रशासन-५/अर्थसंकल्प-१६, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती (का-१४११), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.